# मुंबई विद्यापीठ

## मार्गदर्शक सुचना

शैक्षणिक वर्ष 2014-15 पासून सुरू करावयाच्या नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम/विषय व वाढीव तुकडया (फक्त कम्युनिटी महाविद्यालये आणि मुंबई विद्यापीठात उपलब्ध नसलेले नाविन्यपूर्ण शिक्षणक्रम - यादी संलग्न) सुरू करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत

मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, शिक्षणक्रम/विषय व वाढीव तुकडया (फक्त कम्युनिटी महाविद्यालये आणि मुंबई विद्यापीठात उपलब्ध नसलेले नाविन्यपूर्ण शिक्षणक्रमांकरिता- यादी संलग्न) सुरू करण्यासाठी इच्छुक शिक्षण संस्थांना व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की,

1. ज्या शैक्षणिक संस्था सन 2014-15 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम 1994 चे कलम 82 नुसार नवीन महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था सुरू करू इच्छितात अशा संस्थांनी आपले प्रस्ताव बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या व शासनाच्या विहीत शुल्कासह **30 ऑक्टोबर 2013 रोजी 6.00 वा.** पर्यंत विद्यापीठाच्या आवक विभाग, फोर्ट परिसर येथे सादर करावेत.

2. जी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था सन 2014-15 या शैक्षणिक वर्षापासून नवीन विद्याशाखा / विषय / अतिरिक्त तुकडया घेवू इच्छितात, अशा संलग्नित महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थानी सदरचे प्रस्ताव बृहत आराखडयातील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या व शासनाच्या विहीत नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह **30 ऑक्टोबर 2013 रोजी 6.00 वा.** पर्यंत विद्यापीठाच्या आवक विभाग, फोर्ट परिसर येथे सादर करावेत.

3. बृहत आराखडा विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर संलग्नता (Affiliation) या लिंकवर उपलब्ध आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 चे कलम 82(2) नुसार बृहत आराखडयामधील तरतुदीप्रमाणेच प्रस्ताव स्वीकारले जातील. बृहत आराखडयात तरतूद नसलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तसेच संबंधीत शासन निर्णय व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 चे तरतुदीनुसार विद्यापीठ स्तरावर छाननी करतांना प्रस्ताव बृहत आराखडयाबाहेरील आढळल्यास किंवा विहीत पध्दतीत नसल्यास सदर प्रस्ताव अपात्र करण्यात येतील.

**महत्वाची सूचना :**

**अर्ज बुधवार दिनांक 30 ऑक्टोबर 2013 रोजी 6.00 वा.**

**पर्यंतच स्वीकारले जातील**

4. अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नाविन्यपूर्ण शिक्षणक्रम व अतिरिक्त तुकडयांची संख्या वाढविण्यास नॅक/एनबीए यांचे मुल्याकन /पुर्नमुल्यांकन झालेल्या महाविद्यालयांना किंवा ज्यांनी नॅक/एनबीए यांचेकडे उद्देशाबाबतचे पत्र (Letter of intent) सादर केलेल्या महाविद्यालयांचेच प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

5. दिनांक 30 ऑक्टोबर 2010 च्या शासन निर्णयानुसार नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम/विषय व वाढीव तुकडया सुरू करण्यासंदर्भात शासनाने विहीत केलेल्या अर्जाचा नमूना (परिशिष्ट अ) तसेच शासन निर्णय क्र.एनजीसी/211(240/11)मशि-4 दिनांक 25 ऑक्टोबर 2011 व क्र.एनजीसी/2012(247/12) मशि-4 दिनांक 2 सप्टेंबर 2013 नुसार अर्जासोबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची सूची (परिशिष्ट ब) व (परिशिष्ट क) विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावरील लिंकवर उपलब्ध आहे. तसेच प्रस्तावातील सर्व कागदपत्रांवर पाठपोट पृष्टक्रमांक लिहून साक्षांकीत करून सादर करणे आवश्यक आहे. सर्व बाबींची पूर्तता करणारे अर्जच स्वीकारले जातील.

6. शासनाच्या विहीत अर्जामधील प्रस्ताव फक्त एक मुळ प्रत अधिक 5 प्रतिंमध्ये शासनाच्या 2 सप्टेंबर 2013 रोजीच्या (परिशिष्ट ब) व (परिशिष्ट क) मधील आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. सदरची कागदपत्रे अनुक्रंमांकानुसारच प्रस्तावासोबत मुखपत्राच्या नमुन्यात जोडण्यात यावीत. तसेच सदरचे प्रस्ताव DVB-TT-Surekh या फॉन्टमध्ये तीन सीडींमध्ये सादर करावेत.

7. विहीत मुदतीनंतर येणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.

8. सदरच्या फाईलवर महाविद्यालयाचे नांव, पत्ता, संपर्काचे दूरध्वनी/भ्रमणध्वनी /फॅक्स तसेच ई-मेल आयडी इत्यादी माहिती नमुद करावी व प्रस्तावाचे स्वरूप (उदा. नवीन विद्याशाखा : वाणिज्य ) ठळक अक्षरात सुस्पष्टपणे नमुद करावे.

9. शासन निर्णयातील निर्देशित कार्यपध्दतीची पूर्तता करणारे प्रस्तावच विद्यापीठाकडून स्वीकारले जातील. तसेच शासन परिपत्रकामध्ये ज्या-ज्या ठिकाणी नोंदणीकृत कागदपत्र/दस्तऐवज असा उल्लेख आहे त्याबाबत मा. दुरयम उपनिबंधक, दस्त नोंदणी कार्यालय यांच्या सहीचे नोंदणीकृत कागदपत्र/दस्तऐवज बंधनकारक आहे.

10. विद्यापीठाने तयार केलेला बृहत आराखडा महाराष्ट विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 82 नुसार शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहूनच विहीत अटी पूर्ण करणा-या प्रस्तावांची शिफारस शासनाकडे करण्यात येईल.

11. विद्यापीठ स्तरावर अमान्य करण्यात आलेले नविन महाविद्यालयांचे प्रस्ताव तसेच विद्यापीठाने शासनास शिफारस केलेले व शासनाने अमान्य केलेल्या नविन महाविद्यालयांच्या प्रस्तावां बाबत त्यांच्या संबंधीत संस्थांना त्यांनी जमा केलेल्या संलग्नता अर्जाची एक तृतीअंश फी परत करण्यात येईल.

**महत्वाची सूचना :**

**अर्ज बुधवार दिनांक 30 ऑक्टोबर 2013 रोजी 6.00 वा.**

**पर्यंतच स्वीकारले जातील**